# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 09.10.2024** **वार – बुधवार**

---

**दंतवैद्य**

पुण्यातील सशस्त्र सेना वैद्यकीय महाविद्यालयाच्या दंत शस्त्रक्रिया आणि मौखिक आरोग्य विज्ञान विभागानं गेले दोन दिवस 'समकालीन दंतवैद्यकामधील उदयोन्मुख आव्हानं: वर्तमान ताजी माहिती आणि भविष्यातील शक्यता' या संकल्पनेवर आधारित 14 व्या राष्ट्रीय दंत विज्ञान परिषदेचं आयोजन केलं. या कार्यक्रमात दंतचिकित्सा क्षेत्रातील समकालीन विषयांवर सशस्त्र सेना आणि तसंच नागरी संस्थांमधील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या वक्त्यांनी चर्चा केली.

**तहान**

पुणे शहरात सोसायट्यांना अधिक पाणी का लागतं, याचा अभ्यास करण्यासाठी 'तहान' संस्थेची नेमणूक करण्यात आली आहे. पुणे महापालिकेतर्फे राबवण्यात येत असलेल्या समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत मोठ्या सोसायट्या आणि बंगल्यांना पाण्याचे मीटर बसविण्यात येत आहेत. यामुळं अनेक ठिकाणी निकषांपेक्षा जास्त पाणी वापरलं जात असल्याचं उघड झालं आहे. तहान संस्थेकडून सोसायटीची टाकी, अंतर्गत वितरण व्यवस्था, पाण्याची गळती, प्रत्यक्ष वापरलं जाणारं पाणी यांचा तुलनात्मक अभ्यास केला जाणार आहे. त्यामुळं अधिक पाणी का वापरलं जातं याची माहिती मिळाल्यास वाया जाणारं पाणी वाचविणं शक्य होणार आहे.

**अपा**

पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज पिंपरी चिंचवड शहरातील विविध विकास कामांचं उद्घाटन, लोकार्पण आणि भूमीपूजन करण्यात आलं. महाराष्ट्राची आर्थिक स्थिती चांगली असून लाडकी बहीण यासह विविध योजना पुढं चालू राहणार आहेत, पिंपरी चिंचवड शहर राज्याचं ग्रोथ इंजिन असून इथल्या पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी सर्वते प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही अजित पवार यांनी या कार्यक्रमांमध्ये दिली. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. बोपखेल इथं मुळा नदीवर उभारण्यात आलेल्या पुलाचं लोकार्पण, स्थायी आदेश पुस्तिकेचं प्रकाशन आणि नवीन शासकीय वाहनांना हिरवा झेंडा दाखविण्याचा कार्यक्रम, निगडी प्राधिकरण इथं हरित सेतूविषयक कामांचं लोकार्पण, पिंपळे सौदागर इथं पवना नदीवर उभारलेल्या पुलाचं लोकार्पण, रक्षक चौकात सांगवी फाटा ते किवळे रस्त्यावर भूमीगत मार्ग उभारण्याच्या कामाचं भूमीपूजन आणि मुळा नदीवर सांगवी ते बोपोडी दरम्यान उभारण्यात आलेल्या पुलाचं लोकार्पण पवार यांच्या हस्ते आज पार पडलं.

**बोनस**

पुणे महापालिकेतील सर्व अधिकारी आणि कर्मचा-यांना दिवाळीच्या मुहूर्तावर ८ पूर्णांक ३३ टक्के बोनस त्याचप्रमाणं २३ हजार रुपये सानुग्रह अनुदान दिलं जाणार आहे. ही रक्कम दिवाळीपूर्वी कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. पुणे महापालिकेच्या वित्त आणि लेखा विभागानं बोनसबाबतचं परिपत्रक जारी केलं असून, सर्व खात्यांना त्यानुसार सूचना केल्या आहेत.

**<u>एसटी</u>**

सरळ सेवा भरती-२०१९ अंतर्गत अतिरिक्त यादीवरील एकंदर १ हजार ५८ उमेदवारांना एसटीच्या सेवेमध्ये चालक तथा वाहक या पदावर सामावून घेतलं जाणार असल्याची माहिती एसटी महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांनी दिली. सन २०१९ च्या भरतीमध्ये निवड झाल्यापैकी गैरहजर अथवा अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या ऐवजी त्याच भरतीमधील प्रतीक्षा यादीवरील सुमारे ३३७ उमेदवारांना नेमणूक देण्याची प्रक्रिया महामंडळात सुरू करण्यात येत आहे.

**<u>दर पत्रक</u>**

पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयानं निश्चित केलेलं टॅक्सीचं दरपत्रक लागू करावं या मागणीसाठी पुणे कॅब संस्थेच्या अध्यक्षा वर्षा शिंदे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आरटीओ कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आलं. आरटीओच्या आदेशाप्रमाणं दर लागू करणार नाहीत अशा कंपन्यांचे अॅप, प्ले स्टोअरवरुन काढून टाकावे, गोव्याप्रमाणं पुण्यात टॅक्सी मीटर द्यावं, बेकायदेशीर प्रवासी वाहतूक करणाऱ्या कॅब कंपन्यांवर बंदी आणावी, आदी मागण्याही कॅब चालकांनी केल्या आहेत.

**<u>दूध</u>**

पुणे जिल्ह्यातील ३ लाख २७ हजार ९८ शेतकऱ्यांच्या खात्यावर दूध अनुदान जमा करण्यात आल्याची माहिती जिल्हा दूध विकास अधिकारी सतीश डोईफोडे यांनी दिली. उर्वरित दूध प्रकल्पांनी शेतकऱ्यांची माहिती तत्काळ द्यावी म्हणजे दूध अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यास विलंब होणार नाही असंही डोईफोडे यांनी सांगितलं.

**<u>रयत</u>**

रयत शिक्षण संस्था आणि विश्वबंधुता साहित्य परिषदेच्या औंध इथल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयांद्वारे पहिलं 'रयत विचारवेध संमेलन' २१ ऑक्टोबरला पुणे श्रमिक पत्रकार भवनामध्ये होणार आहे. या संमेलनाचं उद्घाटन रयत शिक्षण संस्थेचे उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव डॉक्टर शिवलिंग मेनकुदळे यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. संमेलनात रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष चंद्रकांत दळवी यांची 'रयतेपासून रयतेपर्यंत' या विषयावर मुलाखत, विश्वबंधुता साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक डॉक्टर श्रीपाल सबनीस यांचा अमृत महोत्सवी सत्कार आणि डॉक्टर सविता पाटील लिखित 'विश्वबंधुतेचे सुवर्णपर्व' या पुस्तकाचं प्रकाशन आदी कार्यक्रमांचा समावेश आहे.

पुणे आणि परिसरात आज आकाश ढगाळ होतं. मात्र अंदाजानुसार पाऊस पडला नाही. कमाल तापमान 32 अंश सेल्सियस राहिल्यानं उकाडा जाणवत आहे. उद्याही असंच हवामान राहण्याची शक्यता आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**